**<u>ठळक बातम्या</u>**

- राज्यात महानगरपालिका निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्याचा उद्या शेवटचा दिवस

- पुणे महानगरपालिकेत दोन्ही राष्ट्रवादी एकत्र, काँग्रेसचा बहुजन वंचित आघाडीबरोबर समेट

- आगामी अर्थसंकल्पाच्या पार्श्वभूमीवर प्रधानमंत्री करणार विविध क्षेत्रातल्या तज्ज्ञांशी चर्चा

- अरावली टेकड्यांच्या नव्या व्याख्येला स्थगिती देण्याचा सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय

**आणि**

- न्यूझीलंडचा अनुभवी अष्टपैलू क्रिकेटपटू डग ब्रेसवेलची सर्व प्रकारच्या क्रिकेटमधून निवृत्तीची घोषणा

**<><><><><>**

राज्यात महानगरपालिका निवडणुकीसाठी प्रशासन आणि राजकीय पक्षांची, उमेदवारांची तयारी जोरात सुरु आहे. निवडणुकीसाठी उमेदवार अर्ज भरण्याचा उद्या शेवटचा दिवस आहे. महायुती आणि महाविकास आघाडी स्थानिक घटकांवर जोर देत वेगवेगळ्या तडजोडी करत आहेत तसंच वेगवेगळ्या नेते पक्षांतर करत आहेत.

मुंबईत काँग्रेस आणि बहुजन वंचित आघाडीमधे समेट झाला आहे, तर राष्ट्रवादी काँग्रेसने स्वबळावर निवडणूक लढवायची ठरवलं आहे. आमदार सना

मलिक यांनी आज ३७ उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली असून एकूण १०० जागा लढवणार असल्याचं सांगितलं.

रिपब्लिकन पक्षाला किमान १६ जागा महायुतीने द्यावा अशी मागणी रामदास आठवले यांनी केली आहे.

ऑल इंडिया एमआयएम पक्षाने ठाणे महानगरपालिकेसाठी ५, तसंच वसई विरार महानगरपालिका निवडणुकीसाठी ३ उमेदवार जाहीर केले आहेत. आपला पक्ष भिवंडी निजामपूर तसंच तळोजा इथंही उमेदवार देणार असल्याचं पक्ष प्रवक्ते इम्तियाज जलील यांनी सांगितलं.

पिंपरी चिंचवडप्रमाणे पुण्यात शरद पवार आणि अजित पवार यांच्या नेतृत्वाखालचे पक्ष एकत्रितपणे निवडणूक लढवणार आहेत अशी घोषणा आज अजित पवार यांनी केली. पुण्यातही काँग्रेसने बहुजन वंचित आघाडीबरोबर समझोता केला आहे.

**जळगावात** शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष ३८ आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष ३७ जागा लढवणार आहे.

**सोलापुरात** भाजपाबरोबर शिवसेनेची चर्चा निष्फळ ठरली असून तिथं राष्ट्रवादीबरोबर जाण्याचा निर्णय घेतल्याचं पक्ष प्रवक्ते सिद्धराम म्हेत्रे यांनी सांगितलं.

**अमरावतीत** शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने २० उमेदवारांची यादी जाहीर केली आहे.

**<><><><><>**

मुंबई महानगरपालिकेत आज मतदानाच्या वेळी कर्तव्यावर नेमण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांसाठी प्रशिक्षण वर्ग आयोजित करण्यात आला होता.

**छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका** निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर काल मतदान केंद्राध्यक्ष आणि मतदान अधिकाऱ्यांचं प्रशिक्षण पार पडलं. महापालिका निवडणुकीसाठी शहरात एकूण आठ हजार मतदान केंद्राध्यक्ष आणि मतदान अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

दरम्यान, महापालिकेच्या प्रभाग क्रमांक २६ राजनगर–मुकुंदनगर इथं भारतीय जनता पक्षाच्या कार्यकर्त्यांची आढावा बैठक काल पार पडली. यावेळी फुलंब्री विधानसभा मतदारसंघाच्या भारतीय जनता पक्षाच्या आमदार अनुराधा चव्हाण उपस्थित होत्या.

**<><><><><>**

ग्रामीण रोजगारासाठीच्या व्हीबी जी राम जी या कायद्यामुळे राज्य सरकारांना गेल्या सात वर्षांच्या तुलनेत १७ हजार कोटी रुपयांचा नफा होणार आहे. तसंच राज्यांच्या निधी वितरणात देखील सुधारणा होईल, असं स्टेट बँक ऑफ इंडियाच्या एका अहवालात म्हटलं आहे. उत्पादक मालमत्ता निर्मितीला चालना देणं, उत्पन्नात वाढ करणं तसंच नियमन प्रणाली कार्यक्षम करणं हे या कायद्यामुळे साध्य होणार आहे. पारदर्शकता, नियोजन, तसंच  जबाबदारी ठरवून रोजगार निर्मिती केल्यामुळे आधीच्या कायद्यातल्या संरचनात्मक त्रुटी नव्या कायद्यामुळे दूर होतील, असं एसबीआयचे मुख्य आर्थिक सल्लागार डॉक्टर सौम्य कांती घोष यांनी म्हटलं आहे.

**<><><><><>**

विकसित भारत जी रामजी कायद्यामुळे ग्रामीण भागातल्या नागरिकांना जास्त दिवस कामं मिळणार आहे. नागरिकांनी त्याचा अधिकाधिक लाभ घ्यावा असं आवाहन धुळे जिल्हा परिषदेच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी स्नेहा पवार यांनी आकाशवाणीशी बोलताना दिली.

**होल्ड - धुळे बाइट**

**<><><><><>**

आगामी अर्थसंकल्पाच्या पार्श्वभूमीवर प्रख्यात अर्थतज्ञ आणि त्या क्षेत्रातल्या तज्ञांची मते ऐकण्यासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या एक बैठक घेणार आहेत. निती आयोगाचे अध्यक्ष, मुख्य कार्यकारी अधिकारी आणि आयोगाचे इतर सभासद या बैठकीला हजर असतील.

**<><><><><>**

अरावली डोंगररांगांच्या नव्या व्याख्येला स्थगिती देण्याचा निर्णय आज सर्वोच्च न्यायालयाने दिला. अरावली पर्वत रांगांच्या नव्या व्याख्येवरून पर्यावरण तज्ज्ञ आणि सामाजिक संघटनांनी व्यक्त केलेल्या चिंतेची सर्वोच्च न्यायालयानं दखल घेतली, आज या प्रकरणी सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्यकांत, न्यायमूर्ती एजी मसीह आणि जे के महेश्वरी यांच्या पीठासमोर सुनावणी झाली. अरावली टेकड्यांच्या नव्या व्याख्येबाबत काही गोष्टी स्पष्ट करणं आवश्यक आहे, आधीच्या समितीच्या शिफारशींची पडताळणी करण्यासाठी एक समिती स्थापन केली जाईल, ज्यात प्रशासकीय अधिकाऱ्यांचाही समावेश असेल असं न्यायालयानं सांगितलं.

नुकत्याच स्वीकारण्यात आलेल्या नव्या व्याख्येनुसार, अरावली टेकड्यांमध्ये समुद्रसपाटीपासून कमीतकमी १०० मीटर आणि त्यापेक्षा जास्त उंची असलेला आणि त्याला जोडणारा उतार असलेला भूप्रदेश समाविष्ट करण्यात आला आहे. अरावली टेकड्यांबाबतचे निकष सौम्य केल्यामुळे या भागातलं खाणकाम आणि बांधकाम प्रकल्पांना वैधता मिळेल, आणि त्यामुळे पर्यावरणाची अपरिमित हानी होईल, असा इशारा पर्यावरण तज्ञांनी दिला आहे.

**<><><><><>**

उन्नाव बलात्कार प्रकरणातला दोषी कुलदीप सेंगर याच्या जन्मठेपेला स्थगिती देण्याचा दिल्ली उच्च न्यायालयाच्या आदेश आज सर्वाेच्च न्यायालयाने रोखून ठेवला. सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्यकांत, न्यायमूर्ती जे के माहेश्वरी आणि न्यायमूर्ती ऑगस्टीन जॉर्ज मसीह यांच्या सुट्टीकालीन खंडपीठाने याबाबतीतल्या

इतर कायदेशीर बाबींवर विचार करण्यासाठी चार आठवड्यांनी सुनावणी घेण्यात येईल, असंही सांगितलं.

उन्नाव बलात्कार प्रकरणी सेंगर याने शिक्षा कालावधीतले सात वर्षे पाच महिने आधीच तुरुंगात काढले आहेत, असं सांगत दिल्ली उच्च न्यायालयाने सेंगर याच्या जन्मठेपेच्या शिक्षेला स्थगिती दिली होती.

<><><><><>

न्यूझीलंडचा अनुभवी अष्टपैलू क्रिकेटपटू डग ब्रेसवेलने आंतरराष्ट्रीय आणि स्थानिक क्रिकेटमधून निवृत्तीची घोषणा केली आहे. ३५ वर्षीय ब्रेसवेल गेल्या काही काळापासून दुखापतींशी झुंजत होता. आणि त्यामुळेच त्याने हा निर्णय घेतला. ब्रेसवेलनं न्यूझीलंडसाठी अनेक ऐतिहासिक विजयांमध्ये महत्त्वाची भूमिका बजावली. २०२३ मध्ये तो न्यूजीलंडसाठी शेवटचा कसोटी सामना खेळला होता. डग ब्रेसवेलने आंतरराष्ट्रीय कारकिर्दीत २८ कसोटी, २१ एकदिवसीय आणि २० टी-२० सामने खेळले. २०११ मध्ये होबार्ट कसोटीत त्याने फक्त ६० धावा देऊन ९गडी बाद केले होते. कसोटी क्रिकेटमध्ये, ब्रेसवेलने २८ सामन्यांमध्ये ७४ बळी घेतले. तर मर्यादित षटकांच्या क्रिकेटमध्ये ४६ गडी बाद केले.

<><><><><>

भारतीय महिला फलंदाज स्मृती मानधना ही महिला क्रिकेटमध्ये सर्वात जलद दहा हजार धावा पूर्ण करणारी खेळाडू ठरली आहे. भारत आणि श्रीलंका यांच्यातील चौथ्या टी-२० सामन्यात तिनं या विक्रमाची नोंद केली. मानधना हिनं २८१ सामन्यांमध्ये दहा हजार धावा पूर्ण केल्या असून हा टप्पा गाठणारी ही चौथी महिला क्रिकेटपटू आहे.

<><><><><>

राज्य पोलिसांच्या  अंमली पदार्थ प्रतिबंधक दलाने बंगळुरू शहर पोलिस आणि अंमली पदार्थ नियंत्रक ब्युरो यांच्या संयुक्त अभियानात मेफेड्रीन तसंच इतर अमली पदार्थ निर्मिती आणि तस्करी प्रकरणी चार जणांना अटक केली. २४ आणि २५ डिसेंबरला झालेल्या या मोहीमेत  एकूण १ कोटी वीस लाख रुपये किमतीचे अंमली पदार्थ आणि १७ किलो कच्चा माल जप्त केल्याची माहिती या दलाच्या अधिकाऱ्यांनी दिली.

//<><><><><>//